IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# 'महिला सबलोकरणासाठी महाराष्ट शासन राबवित असलेल्या विविध शैक्षणिक व इतर उपकमांचा अभ्यास '

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पी. एच. डी.
(शिक्षणशास्त्र) अभ्यासकमाच्या अंशतः पुर्तीसाठी सादर केलेला लघुशोध प्रबंध

✍संशोधक ✍
श्री शिंदे चंद्रशेखर उत्तमराव

🕮मार्गदर्शक✍
डॉ. मधुकर अंबाजी पुंडगे
;डण ।ण डण्कण चैण्कण म्कनबंजपवदद्ध
श्री. संत गाडगे महाराज अध्यापक महाविद्यालय बळसोंड हिंगोली

✍संशोधन केंद्र ✍
शिक्षणशास्त्र संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## प्रकरण एक
## प्रस्तावना

1.1 प्रास्ताविक

1.2 समस्या विधान

1.3 पारिभाषिक शब्दाच्या व्याख्या

1.4 संशोधनाची गरज व महत्व

1.5 संशोधनाची उद्धिष्टे

1.6 संशोधन समस्येची व्याप्ती

1.7 संशोधनाची मर्यादा

1.8 संशोधन कार्याची कालमर्यादा

1.1 प्रास्ताविक

• संशोधनाची पार्श्वभुमीः–

देशातील एकूण लोकसंख्यापैकी निम्मी लोकसंख्या ही स्त्रियांची आहे म्हणजे देशाचा निम्मा आर्थिक विकास हा स्त्रियांच्या योगदानावर अवलंबुन आहे. तसेच आजचा बालक हा उद्याचा नागरिक आहे. त्याचे आरोग्य प्राथमिक अवस्थेपासून सुदृढ व कुपोषनरहीत बनविने आवश्यक आहे. त्यासाठी समाजात स्त्रीला तीन भूमिका पार पाडव्या लागतात. 1. मुलगी 2. पत्नी 3. माता या तीन्ही भुमिका यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आजची स्त्री सुसंस्कारीत असणे आवश्यक आहे. शिक्षणामुळे तिच्यात आत्मविश्वास व स्वावलंबनाची भावना निर्माण होते. तिच्या स्वावलंबीन विकासासाठी शिक्षण हे उत्तम माध्यम आहे. शिक्षणा बरोबरच तिचे सबलीकरण होण्यासाठी शासनाने विविध उपकम राबविणे आवश्यक आहे की जेणे करून तिच्या सर्वांगीन विकासाल चालना मिळेल.

📖 स्वातंत्रपूर्व काळातील स्त्रियांची शैक्षणिक स्थितीः–

✍ महात्मा ज्योतीबा फुले यांनी भीड यांच्या वाडयात 1848 मध्ये पहिली मुलीची शाळा सुरू केली.

✍ त्यांच्या या स्त्री शिक्षणाच्या कार्यात त्यांची पत्नी सावित्रीबाई फुले यांचा वाटा महत्वाचा आहे. तसेच त्या भारतातील पहीली शिक्षिका म्हणून ओळखल्या जातात.

✍ महाराष्टात मुलींसाठी शाळा सुरू करण्याचे कार्य महात्मा फुले, नाना शंकर शेठ, डॉ. भाऊ दाजी लाड व पंडीता रमाबाई यांनी केले.

📖 स्वातंत्रोत्तर काळातील स्त्रियांची शैक्षणिक स्थितीः–

✍राज्यात 2001 – 02 मध्ये मुलींसाठी 2,055 प्राथमिक शाळा व 256 उच्च माध्यमिक शाळा संस्था कार्यरत होत्या

✍ राज्यात 2001–02 मध्ये प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक संस्थांमधील एकूण विद्यार्थ्यांमध्ये मुलींचे शेकडा प्रमाण अनुकमे 49, 45 व 42 होते. 1985– 86 मध्ये जेव्हा मुलींसाठी 10 वी पर्यंत शिक्षण मोफत करण्यात आले तेव्हा हे शेकडा प्रमाण अनुकमे 44, 36 आणि 32 होते.

सद्यस्थितीचा आढावा

✍2011 च्या जनगणणेनुसार भारतातील स्त्री पुरूष साक्षरताः–

एकूण त्र 70.04 टक्के
महिला त्र 65.48 टक्के
पुरूष त्र 82.14 टक्के

यापूर्वी (2001 च्या) जनगणणेची स्थितीः –

एकूण त्र 64.83 टक्के
महिला त्र 53.67 टक्के
पुरूष त्र 75.26 टक्के

स्त्री पुरूष साक्षरता प्रमाणातील गॅपः—
2001 त्र 21.59 टक्के
2011 त्र 16.66 टक्के

0 ते 6 वयोगट— एकूण लोकसंख्ये मधील प्रमाणः—
मुले त्र 07.50 टक्के
मुली त्र 06.26 टक्के
एकूण त्र 13.76 टक्के

1.2 समस्या विधान

✍“महिला सबलीकरणासाठी शासन राबवित असलेल्या विविध शैक्षणिक व इतर उपकमांचा अभ्यास”

1.3 सबलीकरण व्याख्या

अ. महिला सबलीकरणः—

महिलांना मानसिक, शारीरिक व बौद्धिक दृष्टीने सबल कार्यक्षम करणे म्हणजेच महिला सबलीकरण

ब. शासनः—
महाराष्ट राज्याचा कार्यभार चालवणारी एक कार्यात्मक संस्था

क. शैक्षणिक उपकमः—
शिक्षणाशी संबंधीत योजना

1.4 संशोधनाची गरज व महत्वः—

1 महिला सबलीकरणाच्या उद्धीष्टाने मुख्याध्यापक तसेच विद्यार्थ्यांची भुमिका स्पष्ट करणे.
2 महिलांचे समाजातील इतर घटकांशी समन्वय साधने.
3 महिला सबलीकरणाच्या अंतर्गत महिला विद्यार्थीनींच्या विकासासंदर्भात चांगल्या व प्रभावीपणे विविध शालेय योजनांच्या आधारे भौतीक सुविधा पूरवणे तसेच ज्ञान रूपांतरीत करणे.
4 महिलांच्या विकासाशी संबंधीत सुचना, मार्गदर्शन व कौशल्य यांना कामकाजाच्या संदेशामध्ये रूपांतरीत करणे.
5 महिलांसाठी विकासाशी संबंधीत योग्य वातावरण निर्मीतो करणे.
6 मुख्याध्यापक, मुख्याध्यापीका तसेच विद्यार्थीनीं मार्फत काम करणा—याच्या कौशल्यात वाढ करून दैनंदिन कामकाजात मार्गदर्शन करणे.
7 समाजातील महिला घटकांची क्षमता वाढविण्याचा प्रयत्न करणे.
8 किशोर शक्ती योगदानाचा अभ्यास करणे.
9 महिलांसाठी उच्च दर्जाच्या सेवा प्रदान करण्यासाठी उपाययोजना करणे.

10 कुटुंब व मुलांचे संगोपण व संवर्धन करणे सोईचे नाही येवढेच नाही तर कुटुंब, मुले, नातेसंबंध जोपासने, पाहुण्याचा पाहुणचार त्यांची व्यवस्था व देखभाल करून नौकरी करणे सोपे नाही येवढेच नाही तर वारंवार होणारे शारिरीक बदल व आजार अशा समस्यांना समोर जाऊन नोकरी करणे हे कसरतीचे आहे. याची ओळख समाजाला करून देण्याच्या दृष्टीने सदर सशोधन महत्वाचे आहे.

11 संशोधनाची गरज महिलांचा दर्जा उंचावा त्यांना पुरूषा प्रमाणे अधिकार मिळावेत व समाजात मानसन्मान मिळावा व त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळावी याच दृष्टीने सदर संशोधनाची गरज आहे.

12 महिलांसाठी अशी व्यवस्थापन यंत्रणा निर्माण व्हावी या दृष्टीने सदर संशोधनाचे महत्व आहे.

16 शासनाने व समाजाने समस्या संदर्भात विचार करून त्यांच्या समस्या कशा सोडविता येतील याचा विचार करण्याच्या दष्टीने सदर संशोधनाचे महत्व आहे.

13 समाजामध्ये महिलांना उपलब्ध असणा–या सोयी सुविधांचा आढावा घेण्याच्या दृष्टीने सदर संशोधनाचे महत्व आहे.

14 प्रशासकोय स्तरावर महिलाचा सर्वांगीन विकास होण्यासाठी त्यांचे हित जोपासण्यासाठी कोणत्या योजना आखल्या जातात व त्या योजना पुरेशा आहेत का? यामुळे शिक्षकांच्या समस्या साडविता येतील का? याचा आढावा घेण्यासाठी सदर सशोधनाची गरज आहे.

15 आज जगाच्या तुलनेत भारतीय स्त्री आदर्श मानली जाते तरी ही भारतीय स्त्रियांचे प्रश्न अनुत्तरीत आहेत. विकासाच्या संकल्पनेत आज शिक्षणाचे मोजमाप होत आहे. किंबहुना ते एक प्रमाण बनले आहे. अशा वेळी एखाद्या ठिकाणी विकास झालाच मात्र त्याखाली स्त्रियांच्या समस्याचे स्वरूप, कारणे यांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने सदर संशोधनाचे महत्व आहे.

**1.5 संशोधनाची उद्धिष्टेः–**

1- महिलांसाठी असणा–या शासनाच्या विविध योजनांचा अभ्यास करणे.

2- महिलांना जाणवणा–या समस्यांवर होणा–या परिणामाचा अभ्यास करणे.

3- योजनांच्या अंमलबजावणीचा अभ्यास करणे.

4- योजनांमध्ये येणा–या समस्यांवर उपाय योजना.

5- अस्तित्व शोधातील स्वायत्तपणा

6- ग्रामीण व शहरी या जगण्यातील समस्येचा संकेतबध्द पातळयांतील महिलांचा सारखेपणा.

7- महिलांमध्ये साक्षरेचे प्रमाण वाढविण्यासाठी महिलांना व्यावसायीक व स्वयंसहाय्यीत माध्यमांचा उपयोग करणे.

8- शाळांमधून मुलींची पटसंख्या वाढविण्यासाठी व मुलींची गळती थांबविण्यासाठी समर्पक कार्यक्रम राबवणे.

9- हंगामी व उसतोड आणि विटभट्टी कामगारांच्या मुलींच्या शिक्षणात खंड पडू नये या करीता त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळाबाहय मुलांचा मागोवा घेवून तीथेच वर्ग चालवणे.

10- मुलींना व्यवसाय शिक्षण देण्यासाठी विविध प्रकारचे उपाय योजना आखणे

11-गृह विज्ञान (भ्वउम ैबपमदबम) पदवी शिक्षणाचे प्रोत्साहन देणे.

12- महिलांच्या आरोग्य विषयक प्रश्न सोडवणे.

13-महिलांना समाजात स्वायत्तता,सुरक्षा व सौरक्षण देणे.

14- महिलांचे मनोबल वाढवणे व त्यांनाही सन्मानाने जगता यावे यासाठी प्रयत्न करणे.

15- महिलांचा आर्थिक सामाजीक व शैक्षणिक विकास घडवून आणणे.

16- महिलांचे साक्षरतेचे प्रमाण वाढवणे.

17- महिलांना स्वत्वाची जाणीव करून देणे व विकास करणे.

18- महिलांच्या सामाजीक व आर्थिक कार्याची व्याप्ती वाढवणे.

19- महिलांना महाराष्ट लोकसेवा आयोगा संबंधित मार्गदर्शन करून देणे.

20- महिलांना तंत्रशिक्षणात गोडी प्राप्त करून देणे.

**1.6** संशोधन समस्येची व्याप्तीः—

1 या संशोधनाची व्याप्ती परभणी, बीड, व औरंगाबाद जिल्हयातील शहरो व ग्रामीण भागातील जिल्हा परिषद व अनुदानित शाळांचा समावेश करण्यात आला आहे.

2 प्रस्तूत संशोधनात केवळ जिल्हा परिषद तसेच खाजगी अनुदानित शाळा प्रकल्पा अंतर्गत विविध प्रकारच्या शैक्षणिक योजनां करीता राबविण्यात येणा—या उपकमाचा विचार केला जाणार आहे. तसेच जिल्हा परिषद तसेच खाजगी अनुदानित शाळांतर्गत शिक्षण घेणा—या विद्यार्थ्यीनींच्या हितार्थ राबविण्यात येणा—या शैक्षणिक उपकमांच्या अंमलबजावणीचा अभ्यास करण्यात येईल.

न्यायदर्शः— शाळा,विद्यार्थी,तालुके,शिक्षक,मुख्याध्यापक

**1.7** संशोधनाची मर्यादाः—

1 प्रस्तूत संशोधन हे परभणी,बीड,औरंगाबाद जिल्हयातील ग्रामोण भागातील व जिल्हा परिषदतील शाळा व खाजगी अनुदानित शाळा पुरते मर्यादित आहे.

2 प्रस्तुत संशोधन हे मुख्याध्यापीका, मुख्याध्यापक आणि विद्यार्थीनीं ई. पुरताच मर्यादित आहे.

3 प्रस्तुत संशोधनात परभणी, बीड, औरंगाबाद, जिल्हयातील ग्रामोण तसेच शहरी महिलांना प्राप्त होणा—या विविध शैक्षणिक योजनाचा विचार केला जाणार आहे.

4 परभणी,बीड,औरंगाबाद, शहराचा जनसंख्येतुन न्यायदर्श निवडीच्या सुगम

यादृच्छिक पद्धतीव्दारे प्रकल्प व शाळा निवडण्यात येतील.

5 प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला जाणार आहे.

1.8 संशोधन कार्याची कालमर्यादाः–

प्रस्तुत संशोधनाची कालमर्यादा ही शैक्षणिक वर्ष 2019–24 साठी आहे. या कालखंडात सदरील संशोधन पूर्ण केले जाईल. सविस्तर कालमर्यादा संशोधनाची कार्यपद्धती या प्रकरणात नोंदविण्यात येईल.

1.9 संशोधन कार्यपद्धतीची कार्यवाहीः–

या संशोधनाची व्याप्ती परभणी, बीड, व औरंगाबाद जिल्हयातील ग्रामीण तसेच शहरापुरतीच आहे. यामध्ये जिल्हा परिषद तसेच अनुदानित शाळांचा समावेश करण्यात आला आहे.परंतु काही प्रकल्पातून व शाळेतून या योजनांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नाही. या योजनांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होउन जास्तीत जास्त महिलांना सक्षम करणे व आरोग्य विषयक विकास करणे व पूर्वशालेय शिक्षण देणे व महिलांना रोजगारांच्या संधी प्राप्त करूण देण्यासाठी उपाययोजना शोधून काढण्यासाठी संशोधकाने प्रस्तुत प्रकल्प हाती घेतला आहे तसेच शासनाकडून राबविण्यात येणा–या विविध योजनाची
परिणामकारकता तपासणे हा या प्रकल्पाचा उददे्श आहे.

या शैक्षणिक योजनांची यशापयशता पडताळून पाहण्यासाठी संशोधकाने बाल विकास प्रकल्प अधिका–याची व मुख्याध्यापक व शिक्षकांची भूमिका आणि योगदान या विषयी माहिती /तथ्य गोळा करण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी त्याने सर्वेक्षण पद्धतीत अंतर्गत प्रश्नावलीचा उपयोग केला आहे. प्रश्नावलीत
संशोधन प्रकल्पाला अनुसरून प्रश्ननिर्मीती करण्यात येईल. तसेच
न्यायदर्श म्हणून त्याने एकूण जनसंख्येतील 10 टक्के न्यायदर्शाची निवड करण्यात येईल. तसेच अनुदानित शाळांचा समावेश करण्यात आला आहे. या शाळांच्या मुख्याध्यापक तसेच विद्यार्थ्यांकडून त्याने प्रश्नावली भरून घेतल्या जाणार आहेत. जमा केलेल्या माहितीचे संख्याशास्त्राच्या आधारे वर्गीकरण करण्यात येईल. त्या आधारे संशोधकाने सांगितले आहेत.

5.2 निष्कर्षः–

महिला सबलीकरणासाठी महाराष्ट शासन राबवित असलेल्या विविध शैक्षणिक व इतर उपकमांच्या योजना खालील प्रमाणे

1. महिलांसाठी विविध शैक्षणिक उपकमांचा अभ्यास करणे.
2. 5 वी ते 10 वी पर्यंतच्या मुलींना सायकली वाटप योजना.
3. महिलांना शिवणयंत्र
4. प्रौढ शिक्षण जनजागृती आणि वाचनालय
5. बालकांची आरोग्य तपासणी
6. ग्रामीण भागातील महिलांसाठी सुलभ शौचालय
7. खेळाचे साहित्य
8. सेविकांना पुरस्कार
9. एकात्मिक बाल विकास योजनेअंतर्गत बालवाडयांना साहित्य
10. प्रोत्साहन स्पर्धाचे आयोजन.
11. पंचायत राज संस्थेचे प्रशिक्षण.
12. महिला प्रतिनिधींसाठी अभ्यास सहल.
13. अपंग मुले व महिलांना कृत्रिम अवयव बसवून त्यांचे पुनर्वसन.

समस्या विधान

- महिला सबलीकरणासाठी महाराष्ट शासन राबवित असलेल्या विविध शैक्षणिक उपकमांचा अभ्यास
- वार्षिक संशोधन नियोजन खालील प्रमाणे सन 2019–20

| अ.क | महिना | कालावधी | संशोधन साहित्य |
|---|---|---|---|
| 1 | 1 ते 6 | सहा महिने | प्रस्तावना व पुर्व संशोधनाचा आढावा |
| 2 | 7 ते 18 | एक वर्ष | क्षेत्रीय अभ्यास व माहितीचे संकलन |
| 3 | 19 ते 30 | एक वर्ष | संकलित माहितीचे पृथ्थकरण व निष्कर्श |
| 4 | 31 ते 37 | सहा महिने | प्रकरण, लेखन इ. |

सही
संशोधक
श्री. शिंदे चंद्रशेखर उत्तमराव

सही
मार्गदर्शक
डॉ. मधुकर अंबाजी पुंडगे
एम.ए.एम.एड. पीएच. डी.
शिक्षणशास्त्र

**5.3 सुचना शिफारशी व उपाययोजनाः–**

- या योजनांच्या माहितीचे भित्तीपत्रके तयार करून त्याचे प्रदर्शने भरवावीत
- विविध शाळांतील मुख्याध्यापक तसेच शिक्षक व विद्यार्थीनीनी व यांनी स्वतः पुढाकार घेवून या योजनेचा लाभ कसा होईल या दृष्टिने प्रयत्न करावा.
- या योजनेची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जावी.
- शैक्षणिक सोयी सवलतीचे अडचणी तसेच कारणे शोधून काढले
- या प्रकल्पा अंतर्गत महिला सबलिकरणासाठी व इतर शैक्षणिक उपकम राबविण्यात येणा–या विविध समस्या सोडविण्यासाठी जिल्हा स्तरावर महिला व बाल विकास समिती नेमण्यात यावी.
- राज्य शासनाच्या सर्व शैक्षणिक योजनांची सविस्तर माहिती असलेली एक माहिती पुस्तिका काढून ती सर्व शाळामध्ये द्यावीत.
- शिक्षकांनी यादृष्टिने जास्तीत जास्त प्रयत्न करावेत.
- पालकांच्या, विद्यार्थ्यांच्या भेटी घेउन त्यांना या योजनांची माहिती, फायदे सांगून प्रोत्साहित करावे.
- ज्या कारणामुळे विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती नामंजूर झाली ती कारणे शोधून दूर करण्याचा प्रयत्न करावा.
- विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीची कारणे शोधून काढावीत

**5.4 पुढील संशोधनासाठी दिशाः–**

- ''महिला सबलीकरण व बालविकासासाठी शासन राबवित असलेल्या विविध शैक्षणिक उपकमांचा अभ्यास'' इ समस्यांवर सशोधन शक्य नव्हते. प्रस्तुत लघुशोध निबंधा व्यतीरीक्त इतर काही समस्यांवर संशोधन करता येईल. ते विषय पुढील प्रमाणे
- महिला सबलिकरण व बालविकासामधील –एकात्मिक बाल विकास प्रकल्पाचे योगदान
- महिला सबलिकरण व बालविकास – काळाची गरज
- सुशिक्षीत व सुदृढ महिला – बालक – समृद्ध भारत
- महिला व बालविकासाची समस्या – एक दृष्टिकोन
- आजचे युगातील महिलांचे स्थान – एक चिकित्सक अभ्यास
- शासनाच्या विविध शैक्षणिक व आरोग्य विशयक योजना– महिला व ए.बा. वि. यो. प्रकल्प यांचा सहसंबंध – एक मुल्यमापन

**सारांश**

- शैक्षणिक संशोधनातील ही शेवटची पायरी आहे. यात काढलेले अनुमान अथवा निष्कर्श याची वैशिष्टे असतात. संशोधकाने हा प्रकल्प कसा पूर्ण केला याची थोडक्यात माहिती अहवाल स्वरूपात पुढील प्रमाणे सांगता येईल
- महिला सबलिकरणासाठी शासन राबवित असलेल्या विविध शैक्षणिक व इतर उपकमांचा समस्या विधान